# करिंथकरांस दुसरे पत्र

१ देवाच्या इच्छेने ख्रिस्त येशूचा प्रेषित पौल
आणि बंधू तिमथ्य ह्यांजकडून;
करिंथमधील देवाच्या मंडळीस व सर्व अखयामधील
सर्व पवित्र जनांस:
[२]देव आपला पिता, आणि प्रभू येशू ख्रिस्त
ह्यांजकडून तुम्हाला कृपा व शांती.

[३]**आपला प्रभू येशू ख्रिस्त** ह्याचा देव आणि पिता,
उपकारांचा पिता व सर्व सांत्वनांचा देव धन्यवादित असो.
[४]तो आमच्या सर्व दुःखांत आमचे सांत्वन करतो; म्हणजे
ज्या सांत्वनाने आमचे स्वतःचे देवाकडून सांत्वन होते त्या
सांत्वनाने आम्ही स्वतः जे लोक कोणत्याही दुःखात
असतात त्यांचे सांत्वन करण्यास समर्थ व्हावे. [५]कारण
जशी आमच्यावर ख्रिस्ताची दुःखे पुष्कळ येतात तसे
ख्रिस्ताकडून आमचे सांत्वनही पुष्कळ होते. [६]आणि
आम्ही जर नाडले जात आहो तर ते तुमच्या सांत्वनासाठी
व तारणासाठी, किंवा आमचे सांत्वन होत आहे तर तेही
तुमच्या सांत्वनासाठी होत आहे. म्हणजे, आम्हीदेखील
सोशीत आहो तशा दुःखांत, ते तुमच्यात सोशिकपणा
उत्पन्न करते. [७]आणि तुमच्याविषयीची आमची आशा
अढळ आहे; कारण आम्ही हे जाणतो की, तुम्ही दुःखांत
भागीदार आहा तसेच सांत्वनात होणार आहा.
[८]बंधूंनो, आमच्यावर आसियात जे संकट आले
त्याविषयी तुम्ही अज्ञानी असावे अशी आमची इच्छा
नाही; म्हणजे आम्ही इतके, शक्तीपलीकडे, पराकाष्ठेचे
भारावलो की, आम्ही आमच्या जिवंत राहण्याविषयीही
निराश होतो. [९]पण आम्ही स्वतःवर भिस्त ठेवू नये, तर
जो देव मेलेल्यांना उठवतो त्याच्यावर आम्ही भिस्त
ठेवावी, म्हणून आम्हाला मरणाची शिक्षा मिळाली होती
असे आम्हाला आमच्या मनात वाटत होते. [१०]त्याने
आम्हाला अशा मरणातून सोडविले, आणि तो सोडवील;
आम्ही त्याच्या ठायी आशा करतो की, तो पुढेही
आम्हाला सोडवील. [११]तुम्हीदेखील आमच्यासाठी प्रार्थना
करून आमचे साह्य करीत रहा; म्हणजे पुष्कळ
मनुष्यांमुळे आम्हाला मिळणाऱ्या कृपादानाकरता
आमच्या वतीने पुष्कळांकडून उपकार मानले जावेत.

[१२]**कारण**, आम्ही दैहिक ज्ञानीपणात नव्हे, पण
देवाच्या कृपेने, जगात आणि विशेषतः तुमच्याशी,
पावित्र्याने आणि देवाने दिलेल्या शुद्ध भावाने वागलो
आहो, ही आमच्या विवेकाची साक्ष आमचा अभिमान
आहे. [१३]कारण तुम्हाला वाचता येतात किंवा समजतात
अशा गोष्टींशिवाय आम्ही तुम्हाला काहीच लिहीत नाही.
आणि मी आशा करतो की, त्या तुम्हाला शेवटीही
समजतील. [१४]जसे तुम्हाला हेही अंशतः समजले आहे
की, जसे प्रभू येशूच्या दिवशी तुम्हीही आम्हाला अभिमान
व्हाल, तसेच आम्ही तुम्हाला अभिमान आहोत.

[१५]**आणि मी ह्या विश्वासामुळे** असे योजले होते
की, प्रथम मी तुमच्याकडे यावे, म्हणजे तुम्हाला दुसरा
एक लाभ मिळावा, [१६]तुमच्याकडून मासेदोनियास जावे व
मासेदोनियाहून तुमच्याकडे परत यावे, आणि तुम्ही मला
यहुदियाकडे पोहचते करावे. [१७]असा विचार करीत
असता, मी चंचलपणाचा अवलंब केला काय? किंवा मी
जे योजतो ते देहाला अनुसरून योजतो काय, म्हणजे माझे
'होय, होय' आणि 'नाही, नाही' असे असावे? [१८]पण देव
खरा आहे; आमचे तुमच्याबरोबर बोलणे 'होय' आणि
'नाही' असे नाही. [१९]कारण आम्ही, म्हणजे मी, सिलवान
व तिमथ्य मिळून, तुमच्यात ज्याची घोषणा केली तो
देवाचा पुत्र येशू ख्रिस्त 'हो, ना' असा नव्हता तर त्याच्यात
'हो'च होते. [२०]कारण देवाची सर्व वचने त्याच्यात 'होय'
अशी आहेत, आणि आपण देवाच्या गौरवासाठी त्याच्या
द्वारे 'आमेन' म्हणतो.
[२१]आता, जो आम्हाला तुमच्याबरोबर ख्रिस्तात
सुस्थिर करीत आहे व ज्याने आपल्याला अभिषेक केला
आहे तो देव आहे. [२२]तसाच त्याने आपल्यावर शिक्का
मारला आहे, आणि आपल्या अंतःकरणात आत्मा हा
विसार दिला आहे.
[२३]आणि तुमची गय करावी म्हणून मी अजून
करिंथला आलो नाही, म्हणून मी देवाला माझ्या
जिवाविरुद्ध साक्षी बोलावतो. [२४]आम्हाला तुमच्या
विश्वासावर अधिकार आहे असे नाही, पण आम्ही

तुमच्या आनंदासाठी तुमचे सहकारी आहोत; कारण तुम्ही विश्वासाने उभे आहात.

**२** **कारण मी स्वतःशी ठरवले** होते की, मी पुन्हा दुःख आणायला तुमच्याकडे येऊ नये. [२]कारण मी जर तुम्हाला दुःखी केले, तर माझ्यामुळे दुःखी झाला आहे त्याच्याशिवाय मला आनंदित करणारा कोण आहे? [३]आणि मी हेच लिहिले होते, म्हणजे मी आल्यावर ज्यांच्याविषयी मी आनंद करावा त्यांच्याकडून मला दुःख होऊ नये, कारण माझा आनंद हा तुमचा सर्वांचा आनंद आहे अशी तुमच्यामधील प्रत्येक जणाविषयी माझी खातरी आहे. [४]कारण, मी दुःखाने व मनाच्या तळमळीने अश्रू गाळीत तुम्हाला लिहिले ते तुम्ही दुःखी व्हावे म्हणून नाही, पण तुमच्यावर जी माझी विशेष प्रीती आहे ती तुम्ही ओळखावी म्हणून आहे.

[५]**जर कोणी दुःख दिले असेल**, तर त्याने मला नाही, पण काही अंशी - मी भर देत नाही - तुमच्यामधील सर्वांना दुःखी केले आहे. [६]अशा मनुष्याला ही बहुमताची शिक्षा पुरी आहे. [७]म्हणून, उलट त्याला क्षमा करून तुम्ही त्याचे सांत्वन करावे; नाहीतर कदाचित् असा कोणीही फार मोठ्या दुःखात गिळला नाही. [८]म्हणून मी तुम्हाला विनंती करतो की, त्याच्यावरील तुमची प्रीती स्थापित करा. [९]कारण मी तुम्हाला ह्या हेतूने लिहिले आहे की, सर्व गोष्टींत तुम्ही आज्ञांकित आहा काय, ह्याचे प्रमाण मला कळावे. [१०]ज्या कोणाला तुम्ही कशाची क्षमा करता त्याला मीही करतो, कारण मी कशाची क्षमा केली असेल तर ज्या कोणाला मी क्षमा केली आहे, त्याला तुमच्याकरता, मी ख्रिस्ताच्या समक्षतेत केली आहे. [११]नाहीतर, सैतान आपल्याला ठकवील; कारण आपण त्याचे विचार जाणत नाही असे नाही.

[१२]**आणि पुढे जेव्हा** मी ख्रिस्ताच्या सुवार्तेसाठी त्रोवसास आलो आणि प्रभूकडून माझ्यासाठी एक दार उघडले गेले, [१३]तेव्हा मला, माझ्या आत्म्यात काही स्वास्थ्य नव्हते, कारण माझा बंधू तीत मला भेटला नाही; पण मी त्यांची रजा घेतली आणि मी तेथून मासेदोनियास गेलो.

[१४]आता जो देव सतत आम्हाला ख्रिस्ताबरोबर विजयाने नेतो आणि त्याच्याविषयीच्या ज्ञानाचा गंध प्रत्येक ठिकाणी आमच्या द्वारे प्रगट करतो त्या देवाला धन्यवाद! [१५]कारण ज्यांचे तारण होत आहे अशा लोकांत आणि ज्यांचा नाश होत आहे अशा लोकांत आम्ही देवाला ख्रिस्ताचा सुवास आहो. [१६]पहिल्यांसाठी मरणाकडे नेणारा मरणाचा वास; आणि दुसऱ्यांसाठी जीवनाकडे नेणारा जीवनाचा वास आहोत. आणि ह्या गोष्टींसाठी कोण लायक आहे? [१७]कारण दुसऱ्या कित्येकांसारखे देवाच्या वचनाची भेसळ करणारे आम्ही नाही; पण आम्ही शुद्ध भावाने, देवाचे म्हणून, देवाच्या दृष्टीपुढे ख्रिस्तात बोलतो.

**३** **आम्ही पुन्हा** आमची स्वतःची प्रशंसा करणे आरंभले काय? किंवा आम्हाला, दुसऱ्यांप्रमाणे, तुमच्याकरता किंवा तुमच्याकडून शिफारसपत्रे हवीत काय? [२]आमच्या मनावर लिहिले गेलेले आमचे पत्र तुम्ही आहात; ते सर्वांनी ओळखले आहे आणि वाचले आहे. [३]कारण आम्ही आणलेले ख्रिस्ताचे पत्र तुम्ही आहा हे आता प्रगट झाले आहे; ते शाईने नाही, तर जिवंत देवाच्या आत्म्याने लिहिलेले, पण दगडी पाट्यांवर लिहिलेले नाही, तर मानवी मनांच्या पाट्यांवर आहे.

[४]आणि ख्रिस्तामुळे देवाच्या ठायी आमचा असा विश्वास आहे. [५]कोणतीही गोष्ट आमची गणण्यास आम्हीच लायक आहो असे नाही, पण आमची लायकी देवाकडून आहे. [६]त्याने आम्हाला नव्या कराराचे सेवक होण्यास पात्र केले. तो लेखाद्वारे केलेला नाही, पण आत्म्याद्वारे केलेला आहे; कारण लेख मरणाची शिक्षा देतो, पण आत्मा जिवंत करतो.

[७]**पण दगडावर कोरलेल्या** अक्षरांत लिहिलेली मरणाची सेवा इतकी गौरवी झाली की, इस्राएल लोक मोशेच्या तोंडावरील तेज पाहून त्याच्या तोंडाकडे टक लावू शकले नाहीत - आणि ते नाहीसे होणार होते - [८]तर आत्म्याची सेवा कशी अधिक गौरवी होणार नाही? [९]पण शिक्षेच्या सेवेत जर गौरव होते, तर नीतिमत्वाची सेवा ही गौरवात पुष्कळ अधिक असणार. [१०]कारण, ह्या बाबतीत जे गौरवी होते, त्याला अधिक मोठ्या गौरवामुळे गौरव

राहिले नाही. ११कारण जे नाहीसे होणार होते ते जर गौरवी होते, तर राहणारे आहे ते अधिक गौरवी असणार.

१२आम्हाला ही अशी आशा असल्यामुळे आम्ही बोलण्याच्या धिटाईचा अवलंब करतो; १३मोशेप्रमाणे करीत नाही; त्याने तोंडावर आच्छादन घातले ते ह्यासाठी की, जे नाहीसे होणार होते ते इस्राएल लोकांना शेवटपर्यंत बघता येऊ नये. १४पण त्यांची मने अंधळी केली गेली, कारण आजवर ते आच्छादन, तसेच जुन्या कराराच्या वाचनात, न काढलेले राहिले आहे; ते ख्रिस्तात नाहीसे झाले आहे. १५पण आजपर्यंत ते आच्छादन, ते मोशेचे वाचन करीत असता, त्यांच्या मनावर घातलेले असते. १६पण ते जेव्हा प्रभूकडे वळेल तेव्हा ते आच्छादन काढले जाईल.

१७आणि प्रभू आत्मा आहे व जेथे प्रभूचा आत्मा आहे तेथे स्वातंत्र्य आहे. १८पण आपल्या तोंडावर आच्छादन नसून आपण सर्व जण, जणू आरशात पाहिल्याप्रमाणे, प्रभूच्या तेजाकडे पहात असता, कलेकलेने त्याच्या प्रतिरूपात आपले रूपांतर होत आहे. हे प्रभूच्या आत्म्याकडून होत आहे.

४ म्हणून, आमच्यावर दया झाल्यामुळे, हे सेवकपण आमचे आहे, हे पाहून आम्ही खचत नाही. २पण शरमेच्या गुप्त गोष्टी आम्ही सोडल्यात; आम्ही कपटाने वागत नाही, किंवा आम्ही देवाचे वचन फसवेपणाने हाताळीत नाही. ३पण देवाच्या दृष्टीपुढे, आम्ही सत्याचे प्रकटीकरण करून, प्रत्येक माणसाच्या विवेकाला आम्ही आमच्याविषयी खातरी देतो. पण आमची सुवार्ता आच्छादली गेली असेल तर ज्यांचा नाश होत आहे त्यांच्यासाठी ती आच्छादली गेली आहे. ४जो ख्रिस्त देवाचे प्रतिरूप आहे त्याच्या गौरवाच्या सुवार्तेचा प्रकाश त्यांना प्रकाशमान होऊ नये म्हणून, असे जे विश्वास ठेवीत नाहीत, त्यांची मने ह्या युगाच्या देवाने अंधळी केलीत.

५कारण आम्ही स्वतःची घोषणा करीत नाही, पण येशू ख्रिस्त जो प्रभू आहे त्याची आम्ही घोषणा करतो, आणि येशूकरता आम्ही तुमचे दास आहोत. ६कारण ज्या देवाने प्रकाशाला अंधारामधून प्रकाशण्यास सांगितले तो आमच्या अंतःकरणात, येशू ख्रिस्ताच्या मुखावरील, देवाच्या गौरवाच्या ज्ञानाचा प्रकाश पाडण्यासाठी प्रकाशला आहे.

७पण आमचे हे धन आमच्याजवळ मातीच्या भांड्यात आहे, ह्याचा अर्थ हा की, सामर्थ्याची पराकाष्ठा आमची नाही पण देवाची आहे. ८आम्ही प्रत्येक बाजूस नाडले गेलो, पण आम्ही नडवले गेलो नाही, आम्ही साशंक झालो, पण निराश झालो नाही, ९आमचा पाठलाग केला गेला, पण त्याग केला गेला नाही, आम्ही खाली पाडले गेलो, पण नष्ट केले गेलो नाही. १०आम्ही निरंतर आमच्या शरिरात येशूचे मरण घेऊन फिरतो; म्हणजे आमच्या शरिरात येशूचे जीवनही प्रगट व्हावे. ११कारण आम्ही जे जिवंत आहोत ते येशूकरता मरणाच्या सतत स्वाधीन केले जात आहोत; म्हणजे आमच्या मर्त्य देहात येशूचे जीवनही प्रगट व्हावे. १२म्हणून, आमच्यात मरण, पण तुमच्यात जीवन हे कार्य करते.

१३मी विश्वास ठेवला आणि म्हणून मी बोललो, हे लिहिल्याप्रमाणे आम्ही विश्वास ठेवला आहे आणि म्हणून बोलतो; १४कारण आमच्यात तोच विश्वासाचा आत्मा आहे. कारण आम्ही हे जाणतो की, प्रभू येशूला ज्याने उठवले तो आपल्यालाही येशूबरोबर उठवील आणि आम्हाला तुमच्याबरोबर सादर करील. १५सर्व गोष्टी तुमच्याकरता आहेत, म्हणजे ही विपुल कृपा पुष्कळ जणांच्या उपकारस्मरणाने, देवाच्या गौरवार्थ बहुगुणित व्हावी.

१६म्हणून आम्ही खचत नाही. पण जरी आमचे हे बाहेरील मनुष्यपण नाश पावत आहे, तरी आमचे आतील मनुष्यपण हे दिवसानुदिवस नवीन होत आहे. १७कारण हे जे हलके दुःख केवळ तात्कालिक आहे ते आमच्यासाठी फार अधिक मोठ्या अशा सार्वकालिक गौरवाचा भार तयार करते. १८आता आम्ही दिसणाऱ्या गोष्टींकडे पहात नाही, पण न दिसणाऱ्या गोष्टींकडे पाहतो. कारण दिसणाऱ्या गोष्टी क्षणिक आहेत पण न दिसणाऱ्या गोष्टी सार्वकालिक आहेत.

५ कारण आम्ही हे जाणतो की, आमचे हे पार्थिव मंडपाचे घर जर मोडले गेले तर आम्हाला स्वर्गात एक देवाची इमारत आहे; जे कोणी हातांनी बांधले

नाही असे ते सार्वकालिक घर आहे. [२]कारण आम्ही ह्यात कण्हत आहोत आणि आमच्या स्वर्गातील घराचे पांघरूण आमच्यावर वरून घातले जावे म्हणून आम्ही उत्कंठित आहोत. [३]म्हणजे, आमच्यावर पांघरूण घातले गेल्याने आम्ही उघडे आढळणार नाही. [४]कारण ह्या मंडपात असलेले आम्ही आमच्यावर भार पडल्यामुळे कण्हतो पण आमचे पांघरूण काढले जावे असे इच्छीत नाही, तर आमच्यावर वरून पांघरूण घातले जावे म्हणजे हे मर्त्यपण जीवनात गिळले जावे.

[५]आणि ह्याच एका गोष्टीसाठी ज्याने आम्हाला तयार केले तो देव आहे; आणि त्यानेच आम्हाला आत्मा हा विसार दिला आहे. [६]म्हणून आम्ही सतत धैर्य धरणारे आहोत; कारण आम्ही हे जाणतो की, आम्ही शरिरात रहात असताना प्रभूपासून दूर आहो. ([७]कारण आम्ही विश्वासाने चालतो, पाहून नाही;) [८]आम्ही धैर्य धरतो, आणि शरिरापासून दूर होऊन प्रभूजवळ राहण्यास आम्ही तयार आहोत.

[९]म्हणून आम्ही झटत आहो, म्हणजे आम्ही येथे किंवा तेथे असलो, तरी देवाला संतोष देणारे असे असावे. [१०]कारण आपल्याला, प्रत्येक जणाला, ख्रिस्ताच्या न्यायासनापुढे प्रगट झाले पाहिजे; ह्यासाठी की, शरिरात केलेल्या गोष्टींबद्दल प्रत्येक मनुष्याला त्याने जे जे केले असेल त्याचे प्रतिफळ मिळावे. ते चांगले असेल किंवा वाईट असेल.

[११]म्हणून आम्हाला प्रभूचे भय कळले असल्यामुळे आम्ही मनुष्यांचे मन वळवतो; पण आम्ही देवाला प्रगट झालो आहो; आणि मी अशीही आशा धरतो की, आम्ही तुमच्या विवेकांत प्रकट झालो आहो. [१२]कारण तुमच्याजवळ आम्ही आमची पुन्हा प्रशंसा करीत नाही, पण तुम्हाला आमच्या बाबतीत अभिमानाला कारण देतो; म्हणजे, माणसाच्या अंतःकरणाविषयी नाही, पण त्याच्या बाहेरच्या स्थितीविषयी जे अभिमान मिरवतात त्यांच्यासाठी तुमच्याजवळ काही उत्तर असावे. [१३]कारण आम्ही वेडे झालो असलो तर देवासाठी तसे आहोत, किंवा समंजस मनाचे असलो तर तुमच्यासाठी तसे आहोत.

[१४]कारण ख्रिस्ताची प्रीती आम्हाला आवरते. कारण आम्ही असे मानतो की, एक सर्वांसाठी मेला तर सर्व मेले, [१५]आणि सर्वांसाठी तो ह्यासाठी मेला की, ह्यापुढे जे जगतील त्यांनी आपल्या स्वतःसाठी नाही, पण त्यांच्यासाठी जो स्वतः मेला आणि पुन्हा उठला त्याच्यासाठी त्यांनी जगावे.

[१६]म्हणून ह्यामुळे, आम्ही कोणाला देहावरून ओळखीत नाही; हो, आम्ही ख्रिस्ताला देहावरून ओळखले आहे तरी आता ह्यापुढे ओळखीत नाही. [१७]म्हणून कोणी मनुष्य ख्रिस्तात असेल तर तो नवी उत्पत्ती आहे; जुने होऊन गेले आहे, बघा, ते नवे झाले आहे; [१८]हे देवाकडून झाले आहे. त्याने येशू ख्रिस्ताच्या द्वारे आपला स्वतःशी समेट केला आणि समेटाची सेवा आम्हाला दिली; [१९]म्हणजे लोकांचे अपराध त्यांच्या हिशोबी न धरता, देव जगाचा ख्रिस्ताद्वारे स्वतःशी समेट करीत होता, आणि समेटाचे वचन त्याने आमच्यावर सोपविले.

[२०]तर मग आम्ही ख्रिस्ताच्या वतीने वकील झालो आहो; जणू तुम्हाला आमच्या द्वारे देव विनंती करीत आहे; ख्रिस्ताच्या वतीने आम्ही तुम्हाला विनवणी करतो की, तुम्ही देवाशी समेट केलेले असे व्हा. [२१]कारण जो पाप जाणत नव्हता त्याला त्याने आपल्यासाठी पाप असे केले, म्हणजे आपण त्याच्या ठायी देवाचे नीतिमत्व असे व्हावे.

६ म्हणून त्याच्याबरोबर काम करणारे आम्हीदेखील तुम्हाला अशी विनंती करतो की, देवाची कृपा व्यर्थ घेऊ नका. [२]कारण तो म्हणतो, 'मी अनुकूल समयी तुझे ऐकले, आणि तारणाच्या दिवशी तुझे सहाय्य केले.' पहा, आता अनुकूल समय आहे, पहा, आता तारणाचा दिवस आहे.

[३]ह्या सेवेला दोष लावला जाऊ नये म्हणून आम्ही, कशात कोणाला, अडखळण्यास कारण देत नाही. [४]पण प्रत्येक स्थितीत देवाचे सेवक म्हणून, आम्ही आमच्याविषयी खातरी पटवतो; आम्ही पुष्कळ सोशिकपणाने संकटांत, आपत्तींत व दुःखांत; [५]फटक्यांत, बंदिवासांत व दंगलींत; कष्टांत, जागरणांत व उपासांत; [६]शुद्धतेने व ज्ञानाने, सहनशीलतेने व ममतेने, पवित्र आत्म्याने व निष्कपट प्रीतीने; [७]सत्याच्या वचनाने व देवाच्या सामर्थ्याने, उजव्या हातात व डाव्या हातात

नीतिमत्वाची शस्त्रे बाळगून, [८]मान होत असता आणि अपमान होत असता, निंदा होत असता आणि स्तुती होत असता आम्ही आमच्याविषयी खातरी पटवतो. फसव्ये, आणि तरी खरे आहोत, [९]अपरिचित आहोत आणि सुपरिचित आहोत, मरत आहोत आणि बघा, आम्ही जगत आहोत. जणू शिक्षा भोगीत होतो, आणि तरी मेलो नाही. [१०]आम्ही दुःखित, तरी सदोदित आनंद करणारे, आम्ही दरिद्री, तरी पुष्कळांना धनवान करणारे, आमच्याजवळ काही नसलेले, आणि तरी सर्व असलेले असे आढळतो.

[११]अहो करिंथकर, तुमच्यासाठी आम्ही तोंड उघडले आहे आणि आमचे अंतःकरण मोठे झाले आहे. [१२]आमच्यात तुम्ही आकसला नाही, पण स्वतःच्या कळवळ्यात आकसला आहा. [१३]आता त्याचा मोबदला म्हणून तुमचेही अंतःकरण मोठे करा. हे मी तुम्हाला मुले म्हणून सांगतो.

[१४]**विश्वास न ठेवणाऱ्यांबरोबर** विजोड जोडलेले होऊ नका; कारण नीतीचा अनाचाराशी वाटा काय? आणि प्रकाशाची अंधकाराशी भागी काय? [१५]ख्रिस्ताचा बलियाराशी संबंध काय? किंवा विश्वासूचा अविश्वासूजवळ भाग कसला? [१६]आणि देवाच्या मंदिराचा मूर्तीशी संबंध काय? कारण तुम्ही जिवंत देवाचे मंदिर आहा. कारण देवाने म्हटले आहे की, 'मी त्यांच्यात राहीन आणि त्यांच्यात वावरेन; मी त्यांचा देव होईन आणि ते माझी प्रजा होतील.'

[१७]आणि म्हणून 'प्रभू म्हणतो की, त्यांच्यामधून बाहेर या आणि वेगळे व्हा; अशुद्धाला शिवू नका; आणि मी तुम्हाला आत घेईन. [१८]आणि मी तुम्हाला पिता होईन आणि तुम्ही माझे पुत्र व्हाल, असे सर्वसमर्थ परमेश्वर म्हणतो.'

७ **प्रियांनो, आपल्याला** ही वचने आहेत, म्हणून आपण देहाच्या व आत्म्याच्या प्रत्येक विटाळापासून स्वतःला शुद्ध करून, आणि देवाच्या भयात राहून आपल्या पवित्रतेची पूर्णतेप्रत वाढ करू.

[२]**आमचा स्वीकार करा;** आम्ही कोणाचा अन्याय केला नाही, कोणाला बिघडवले नाही, कोणाचा फायदा घेतला नाही. [३]कारण मी अगोदर सांगितले आहे की, तुमच्याबरोबर आम्ही जगावे आणि मरावे असे तुम्ही आमच्या अंतःकरणात आहात. [४]माझे तुमच्याशी धैर्य मोठे आहे; माझा तुमच्याविषयी अभिमान मोठा आहे; मी आनंदाने भरलो आहे, आणि आपल्या सर्व दुःखांत मी अतिशय आनंदात आहे.

[५]कारण आम्ही मासेदोनियास आल्यावर आमच्या देहाला स्वास्थ्य नव्हते; आम्ही सगळीकडून नाडले गेलो, बाहेरून भांडणे व आतून भीती, [६]तरीही, जो देव लीन अवस्थेत असलेल्यांचे सांत्वन करतो त्याने आमचे तीताच्या येण्याकडून सांत्वन केले. [७]आणि केवळ त्याच्या येण्यामुळे नाही, पण तो जेव्हा तुमची उत्कंठा, तुमचा शोक व तुमची माझ्याविषयीची ईर्ष्या ह्यांविषयी आम्हाला सांगत होता तेव्हा त्याचे तुमच्यात ज्या सांत्वनाने सांत्वन झाले त्यामुळे मी अधिक आनंदित झालो.

[८]कारण मी एका पत्राने तुम्हाला दुःखी केले होते, तरी मला वाईट वाटत नाही; मला वाईट वाटले होते, कारण मला दिसले होते की, त्या पत्राने, जणू घटकाभर, तुम्हाला दुःखी केले होते; [९]आणि, तुम्हाला दुःख झाले म्हणून मी आनंद करीत नाही; पण तुम्हाला दुःख होऊन पश्चात्ताप झाला म्हणून करतो. कारण तुम्ही दैविक प्रकारे दुःखी झाला, आणि आमच्याकडून तुमची हानी होऊ नये म्हणून असे झाले.

[१०]कारण दैविक दुःख हे पश्चात्तापकारक न होणाऱ्या तारणासाठी पश्चात्ताप हा परिणाम घडविते. पण जगाचे दुःख मरण हा परिणाम घडविते. [११]कारण बघा, तुम्हाला अशा दैविक प्रकारे दुःख झाले, ह्या एकाच गोष्टीने तुमच्यात काय आस्था उत्पन्न केली! हो, काय तुमचे प्रत्युत्तर, हो, काय संताप, हो, काय भय, हो, काय उत्कंठा, हो, काय ईर्ष्या, हो, काय न्यायबुद्धी! सर्व प्रकारे, स्वतःच्या बाबतीत निर्दोष असल्याची तुम्ही स्वतःविषयी खातरी दिली आहे.

[१२]म्हणून मी तुम्हाला लिहिले, तरी जो अपराध करीत होता त्याच्या बाबीकरता नाही, किंवा ज्याचा अपराध केला गेला त्याच्या बाबीकरताही नाही, पण देवाच्या दृष्टीपुढे, तुमच्याविषयीची आमची काळजी तुम्हाला प्रगट केली जावी म्हणून ते लिहिले. [१३]ह्यामुळे आमचे सांत्वन झाले आहे; आणि शिवाय आमच्या सांत्वनात आम्ही

तीताच्या आनंदामुळे अधिक आनंदित झालो; कारण तुम्ही सर्वांनीही त्याच्या आत्म्याला स्वास्थ्य दिले होते.

[१४]आणि तुमच्याविषयी त्याच्यापुढे मी जर अभिमान मिरवला असेल तर मला काही लाज वाटत नाही. पण आम्ही ज्याप्रमाणे तुमच्याबरोबर सर्व काही खरेपणाने बोलतो, त्याचप्रमाणे तीतापुढील आमचा अभिमान खरेपणाचा आढळला आहे. [१५]तुमच्या सर्वांच्या आज्ञांकितपणाची म्हणजे तुम्ही भय धरून, कापत कापत, त्याचे कसे स्वागत केले ह्याची त्याला आठवण होत असता तुमच्यासाठी त्याचा जीव फार उत्कंठित होतो. [१६]सर्व गोष्टींत तुमच्याविषयी तो धैर्य धरतो, आणि म्हणून मी आनंद करीत आहे.

८ शिवाय, बंधूंनो, माझी अशी इच्छा आहे की, मासेदोनियातील मंडळ्यांना देवाची जी कृपा पुरवली गेली तिच्याविषयी आम्ही तुम्हाला लिहावे. [२]ती अशी की, त्यांच्या संकटाच्या मोठ्या कसोटीत, त्यांच्या आनंदाच्या विपुलतेने व त्यांच्या सखोल दारिद्र्याने, त्यांच्या औदार्याचे धन वाढविले.

[३]कारण मी त्यांच्या शक्तीविषयी साक्ष देतो, आणि ते त्यांच्या शक्तीपलीकडेही स्वतः तयार होते. [४]आणि पवित्र जनांच्या सेवेत आपण आम्हाला भाग घेऊ द्या, अशी त्यांनी फार आग्रहाने आमच्या कृपेची याचना केली; [५]आणि आम्ही आशा केल्याप्रमाणे नाही, पण प्रथम त्यांनी आपल्या स्वतःला प्रभूला दिले, आणि देवाच्या इच्छेप्रमाणे आम्हाला दिले. [६]आणि म्हणून आम्ही तीताला विनंती केली की, ज्याप्रमाणे त्याने तुमच्यात ह्या कृपेच्या कार्याचा आधी आरंभ केला, त्याप्रमाणे त्याने तुमच्यात ते पूर्णही करावे. [७]तर ज्याप्रमाणे प्रत्येक गोष्टीत, विश्वासात, बोलण्यात व ज्ञानात, सर्व आस्थेने, आणि आमच्यावरील तुमच्या प्रीतीत तुमची वाढ झालेली आहे त्याप्रमाणे ह्याही कृपेत तुमची वाढ होऊ द्या.

[८]मी हे आज्ञा म्हणून सांगत नाही, पण दुसऱ्यांच्या आस्थेचे कारण झाल्यामुळे, मी तुमच्या प्रीतीच्या खरेपणाची पारख करावी, म्हणून हे सांगतो. [९]कारण आपला प्रभू येशू ख्रिस्त ह्याची कृपा तुम्हाला समजली आहे, ती अशी की, तो संपन्न असता तुमच्याकरता दरिद्री झाला, म्हणजे त्याच्या दारिद्र्याने तुम्ही संपन्न व्हावे.

[१०]आणि ह्या बाबतीत मी मत देतो; कारण ज्या तुम्ही, एक वर्षापूर्वी केवळ हे करण्याचा आधी आरंभ केला नाही, पण हे करण्याची इच्छा धरण्यास आधी आरंभ केला आहे, त्या तुमच्यासाठी हे हिताचे आहे. [११]तर आता, तुम्ही हे करणे पूर्ण करा, म्हणजे इच्छा धरण्याच्या उत्सुकतेप्रमाणे तुमच्याजवळ असेल त्यातून तिची पूर्णता व्हावी. [१२]कारण प्रथम उत्सुकता असेल तर माणसाजवळ जे असेल त्यावरून ती मान्य होते, नसेल त्यावरून नाही.

[१३]कारण दुसऱ्यांना स्वास्थ्य व तुमच्यावर भार असे नाही. [१४]पण सारख्या भागीने, आताच्या काळात, तुमच्या विपुलतेने त्यांच्या गरजेत पुरवठा व्हावा, म्हणजे तुमच्या गरजेत त्यांच्या विपुलतेने पुरवठा व्हावा; आणि सारखी भागी व्हावी. [१५]कारण असे लिहिले आहे की, 'पुष्कळ घेणाऱ्यांजवळ अधिक नव्हते आणि थोडे घेणाऱ्यांजवळ कमी नव्हते.'

[१६]पण तुमच्याविषयी तीच उत्कंठा तीताच्या मनात ज्याने घातली त्या देवाला धन्यवाद! [१७]कारण त्याने खरोखर तो आग्रह मानला, पण तो अधिक उत्सुक असल्यामुळे तो स्वतः होऊन तुमच्याकडे येत आहे; [१८]आणि आम्ही ज्या बंधूला त्याच्याबरोबर पाठवीत आहोत तो असा आहे की, सर्व मंडळ्यांत त्याची सुवार्तेकरता प्रशंसा होत आहे. [१९]आणि इतकेच नाही, तर आम्ही प्रभूच्या गौरवासाठी व तुमच्या उत्सुकतेसाठी, ज्या देणगीचा कारभार चालवीत आहोत, त्या देणगीसोबत आमच्याबरोबर जाण्यास त्याला मंडळ्यांनी नेमले आहे; [२०]म्हणजे आम्ही ज्या देणगीचा कारभार चालवीत आहोत, त्या देणगीबाबत कोणी आम्हाला दोष लावावा, हे आम्ही टाळीत आहोत. [२१]कारण आम्ही प्रभूच्या दृष्टीपुढे नाही, पण माणसांच्या दृष्टीपुढेही प्रामाणिक गोष्टींवर लक्ष ठेवतो.

[२२]आणि आम्ही आमच्या ज्या बंधूला त्याच्याबरोबर पाठवीत आहोत, तो आवेशी आहे, हे आम्ही पुष्कळ वेळा, पुष्कळ गोष्टींत पारखले आहे, आणि तुमच्यावर मोठी भिस्त असल्यामुळे तो आता अधिक आवेशी आहे. [२३]तीताविषयी कोणी विचारील, तर तो माझा भागीदार आहे व तुमच्या बाबतीत माझा जोडीदार-कामकरी आहे,

किंवा आमच्या बंधूंविषयी विचारील, तर ते मंडळ्यांचे
जासूद व ख्रिस्ताचे गौरव आहेत. [२४]म्हणून त्यांना तुमच्या
प्रीतीचे व तुमच्याविषयीच्या आमच्या अभिमानाचे तुम्ही
मंडळ्यांपुढे प्रमाण दाखवा.

९ **आता पवित्र जनांच्या** सेवेविषयी मी हे
तुम्हाला लिहिणे अधिक होईल. [२]कारण मी तुमची
उत्सुकता जाणतो आणि म्हणून मी मासेदोनियातील
मंडळ्यांपुढे तुमच्याविषयी असा अभिमान मिरवतो की,
अखयाने गेल्या वर्षी आपली तयारी केली, आणि तुमच्या
ईर्ष्येमुळे इकडील बहुतेक जण उत्तेजित झाले. [३]तरी ह्या
बाबतीत तुमच्याविषयीचा आमचा अभिमान व्यर्थ होऊ
नये म्हणून मी ह्या बंधूंना धाडीत आहे; आणि मी
सांगितल्याप्रमाणे तुम्ही आपली तयारी केलेली असावी.
[४]आणि कदाचित्, मासेदोनियाचे लोक जर माझ्याबरोबर
आले, आणि तुम्ही तयारीत नसलेले आढळला, तर ह्या
खातरीमुळे आमची (आम्ही म्हणत नाही की, तुमची)
फजिती होईल. [५]म्हणून मला हे आवश्यक वाटते की,
ह्यांनी तुमच्याकडे आधी जावे अशी ह्या बंधूंना विनंती
करावी, आणि तुम्ही देऊ केलेली देणगी त्यांनी आधीच
तयार करावी; म्हणजे लोभाने घेऊन नाही, पण देणगी
म्हणून ती तयार राहील.

[६]**पण असे आहे की,** थोडे पेरणारा थोडेच पीक गोळा
करील, आणि पुष्कळ पेरणारा पुष्कळ पीक गोळा करील.
[७]प्रत्येक मनुष्याने आपल्या मनात जे ठरविले असेल
त्याप्रमाणे त्याने द्यावे; दुःखाने किंवा निरुपायाने देऊ नये.
कारण जो खुशीने देतो त्याच्यावर देव प्रीती करतो.
[८]तुमच्याजवळ सर्व गोष्टींत सदा, सर्व पुरवठा रहावा
आणि प्रत्येक चांगल्या कामात तुम्ही संपन्न व्हावे म्हणून
देव तुम्हाला सर्व प्रकारची कृपा पुरवण्यास समर्थ आहे.
[९]कारण असे लिहिले आहे की,

> तो चहूकडे वाटतो,
> तो गरिबांना देतो,
> त्याचे नीतिमत्व सर्वकाळ राहते.

[१०]आता जो पेरणाऱ्याला बी व खाण्यासाठी भाकर
पुरवतो तो तुमच्यासाठी बी पुरवील आणि बहुगुणित
करील व तुमच्या नीतिमत्वाचे पीक वाढवील. [११]तुम्ही
सर्व औदार्यासाठी प्रत्येक गोष्टीत सधन केले जाल व
देवाचे उपकारस्मरण होण्यास ते आमच्या द्वारे कारणीभूत
होईल.

[१२]कारण ह्या सेवेचे काम केवळ पवित्र जनांच्या
गरजा पुरविणे एवढेच नाही, पण देवाच्या पुष्कळ
उपकारस्मरणात ते बहुगुणित होते. [१३]ज्या सेवेच्या
परीक्षेखाली, ख्रिस्ताच्या सुवार्तेच्या अंगिकारातील
तुमच्या आज्ञांकितपणामुळे आणि त्यांच्यासाठी व
सर्वांसाठी तुम्ही केलेल्या उदार भागीमुळे ते देवाचे गौरव
करतात; [१४]आणि देवाच्या तुमच्यावरील अपार कृपेमुळे ते
स्वतः तुमच्यासाठी प्रार्थना करून उत्कंठित असतात.

[१५]देवाच्या अवर्णनीय दानाबद्दल त्याला धन्यवाद!

१० **पण जो मी, पौल,** तुमच्यात असताना
लीन असतो, पण दूर असताना तुमच्याबरोबर
धीट होतो, तो मी तुम्हाला ख्रिस्ताच्या सौम्यतेने व
सहनशीलतेने विनंती करतो. [२]पण मी तुम्हाला विनवणी
करतो की, आम्ही देहाला अनुसरून चालतो असा
आमच्याविषयी जे विचार करतात त्यांच्याबरोबर धीट
होण्यास मी ज्या विश्वासाने विचार करीत आहे त्याप्रमाणे
मी समोर आल्यावर मला धीट व्हावे लागू नये. [३]कारण,
आम्ही देहात चाललो, तरी देहाला अनुसरून लढत नाही.
[४]कारण आमच्या लढाईची शस्त्रे दैहिक नाहीत, पण
देवासाठी किल्लेकोट पाडण्यास ती समर्थ आहेत.
[५]तर्कवितर्क, आणि देवाच्या ज्ञानाविरुद्ध स्वतःस
उंचावणारी प्रत्येक उंच गोष्ट पाडून टाकून, ख्रिस्ताच्या
आज्ञापालनासाठी आम्ही प्रत्येक विचाराला कह्यात
आणतो. [६]आणि तुमचे आज्ञापालन पूर्ण झाल्यावर आम्ही
प्रत्येक आज्ञाभंगाला शासन करण्यास तयार आहोत.

[७]तुमच्यासमोर जे आहे ते पहा; जर कोणी मानीत
असेल की, मी स्वतः ख्रिस्ताचा आहे तर त्याने स्वतः
पुन्हा विचार करावा की, तो जसा ख्रिस्ताचा आहे तसेच
आम्हीही ख्रिस्ताचे आहोत. [८]कारण, प्रभूने आम्हाला जो
आमचा अधिकार उभारणी करण्यास दिलेला आहे, तुमचा
नाश करण्यास दिलेला नाही, त्याचा मी अधिक अभिमान
मिरवल्यास मला लाज वाटणार नाही; [९]म्हणजे मी पत्रांद्वारे
दटावू पाहतो असे माझ्याविषयी कोणास वाटू नये.
[१०]कारण ते म्हणतात की, त्याची पत्रे वजनदार व जोरदार
असतात, पण त्याच्या उपस्थितीत शरीर अशक्त आणि
बोलणे उपेक्षणीय असते. [११]अशा लोकांनी हा विचार

करावा की, आम्ही जसे दूर असताना आमच्या पत्रांतील बोलण्यात असतो, तसे आम्ही जवळ असताना कृतीत असतो.

१२कारण, जे कित्येक जण आपण आपलीच प्रशंसा करतात त्यांच्यात आमची गणना करण्यास, किंवा त्यांच्याशी आमची तुलना करण्यास आम्ही धजणार नाही, पण स्वतःला स्वतःचे प्रमाण लावून आणि स्वतःशी स्वतःची तुलना करून ते शहाणे होत नाहीत. १३आम्ही आमच्या हद्दीबाहेर अभिमान मिरवणार नाही; पण देवाने आम्हाला लावून दिलेल्या, आमच्या मर्यादेच्या हद्दीत, थेट तुमच्यापर्यंत पोहोचणाऱ्या हद्दीत आम्ही अभिमान मिरवू. १४कारण जणू, आम्ही तुमच्यापर्यंत पोहोचलो नव्हतो, अशा प्रकारे, आम्ही हद्दीबाहेर सरकत नाही. कारण, आम्ही ख्रिस्ताची सुवार्ता गाजवीत तुमच्यापर्यंत प्रथम आलो. १५हद्दीबाहेर दुसऱ्यांच्या कामात अभिमान मिरवीत आलो नाही; पण आम्हाला आशा आहे की, तुमचा विश्वास वाढेल तेव्हा, आमच्या हद्दीत, तुम्ही आमचे स्थान अधिक मोठे कराल. १६म्हणजे, दुसऱ्यांच्या हद्दीत करण्यात आलेल्या गोष्टींचा अभिमान न मिरवता, आम्ही तुमच्या पलीकडील प्रांतांत सुवार्ता सांगू.

१७पण जो कोणी अभिमान मिरवतो त्याने प्रभूविषयी अभिमान मिरवावा; १८कारण स्वतःची प्रशंसा करतो तो नाही, पण प्रभू ज्याची प्रशंसा करतो तो लायक आहे.

११ **मी प्रार्थना करतो की,** तुम्ही माझे थोडेसे मूर्खपण सहन करावे; तरी माझे सहन करा. २कारण तुमच्या बाबतीत मी दैवी ईर्ष्येने ईर्ष्या धरली आहे; कारण मी एका पतीशी तुमचा वाङ्निश्चय केला आहे; म्हणजे तुम्हाला एक शुद्ध कुमारिका म्हणून, मी ख्रिस्ताला सादर करावे.

३पण सापाने कपटाने हव्वेची फसवणूक केली, तशी तुमची मने तुमच्या ख्रिस्तावरील निष्ठेपासून कशामुळे तरी भ्रष्ट होतील अशी मला भीती वाटते. ४कारण, जर कोणीही येऊन, आम्ही ज्याची घोषणा केली नाही अशी दुसऱ्या येशूची घोषणा केली, किंवा तुम्हाला मिळाला नव्हता असा दुसरा आत्मा तुम्हाला मिळाला, किंवा तुम्ही स्वीकारली नाही अशी दुसरी सुवार्ता तुम्हाला मिळाली तर तुम्ही त्याचे सहन करता. ५कारण मी मानतो की, मी त्या अतिश्रेष्ठ प्रेषितांपेक्षा काहीच कमी नाही. ६आणि मी भाषेत अशिक्षित असलो तरी ज्ञानात नाही. आम्ही हे तुम्हाला सर्व गोष्टींत, सर्व प्रकारे, प्रगट केले. ७तुम्ही मोठे केले जावे म्हणून मी स्वतःला लहान केले; कारण मी तुम्हाला देवाची सुवार्ता फुकट गाजविली ह्यात मी अपराध केला काय? ८तुमची सेवा करण्याकरता मी दुसऱ्या मंडळ्यांना, त्यांचे वेतन घेऊन लुटले. ९जेव्हा मी तुमच्याबरोबर होतो आणि मला कमी पडले, तेव्हा मी कोणावर भार घातला नाही; कारण मला जे कमी होते ते मासेदोनियाहून आलेल्या बंधूंनी पुरवले; आणि तुम्हाला भारभूत होण्यापासून मी स्वतःस सर्वस्वी संभाळले आहे, आणि संभाळीन. १०ख्रिस्ताचे सत्य माझ्यात असल्यामुळे माझा हा अभिमान, ह्या अखयाच्या भागात कोणी बंद करणार नाही.

११का? कारण मी तुमच्यावर प्रीती करीत नाही? देव जाणतो. १२तरी मी जे करीत आहे ते मी करीत राहीन. म्हणजे त्यांना जे कारण पाहिजे आहे ते मी त्यांच्यासाठी ठेवू नये. ते त्यांना ह्यासाठी हवे आहे की, ते ज्या कामात अभिमान मिरवतात त्यात ते आमच्यासारखे दिसावेत. १३कारण हे खोटे प्रेषित, फसवे कामकरी ख्रिस्ताच्या प्रेषितांचे रूप घेत आहेत. १४आणि आश्चर्य नाही; कारण स्वतः सैतानाने प्रकाशाच्या देवदूताचे रूप घेतले आहे. १५मग जर त्याच्या सेवकांनाही नीतिमत्वाच्या सेवकांचे रूप देण्यात आले, तर काही मोठेसे झाले नाही; त्यांचा शेवट त्यांच्या कामांप्रमाणे होईल.

१६मी पुन्हा सांगतो की, मला कोणीही मूर्ख समजू नये; पण, तुम्ही समजत असल्यास माझा मूर्ख म्हणून स्वीकार करा. म्हणजे मला स्वतःला थोडासा अभिमान मिरवता येईल. १७मी हे बोलत आहे ते प्रभूला अनुसरून बोलत नाही, पण मी ह्या अभिमानाच्या धीटपणाने, जणू हे मूर्खपणाने बोलतो. १८जसे पुष्कळ लोक दैहिक दृष्ट्या अभिमान मिरवतात तसा मी पण अभिमान मिरवीन. १९कारण तुम्ही शहाणे आहात म्हणून मूर्खांचे आनंदाने सहन करता. २०कारण कोणी तुम्हाला दास्यात नेले, कोणी गिळले, कोणी धरले, कोणी स्वतःला वरचढ केले, कोणी तुमच्या तोंडात मारले तर तुम्ही त्याचे सहन करता. २१आम्ही जणू दुर्बळ होतो म्हणून मी हे स्वतःस दोष लावून बोलतो.

२२**पण कोणी ज्या कशात धीट** असेल त्यात मीही धीट आहे (मी हे मूर्खपणाने बोलतो). ते इब्री आहेत

काय? मीही आहे. ते इस्राएली आहेत काय? मीही आहे. ते अब्राहामाचे वंशज आहेत काय? मीही आहे. [२३]ते ख्रिस्ताचे सेवक आहेत काय? (मी हे वेड्याप्रमाणे बोलतो) मी अधिक आहे. कष्टांत पुष्कळ अधिक आहे, अधिक वेळा तुरुंगात होतो, प्रमाणाबाहेर फटके खाण्यात अधिक आहे, अनेक वेळा मरणात सापडलो. [२४]मला यहुद्यांकडून पाचदा एकूणचाळीस फटके मिळाले. [२५]तीनदा मला छड्यांनी मारले, एकदा दगडमार केला गेला, तीनदा माझे गलबत फुटले; एक रात्र आणि एक दिवस मी तुरुंगात होतो. [२६]पुष्कळ वेळा प्रवास करताना पुरांमुळे संकटे आली, लुटारूंमुळे संकटे आली, माझ्या लोकांमुळे संकटे आली, आणि परजनांमुळे संकटे आली; नगरात संकटे आली, रानात संकटे आली, समुद्रावर संकटे आली, खोट्या बांधवांमुळे संकटे आली; [२७]काम करताना दगदग काढली, पुष्कळ वेळा जागरणे काढली, भूक काढली, तहान काढली, पुष्कळ वेळा उपास काढले, थंडी सोसली, वस्त्राची वाण सहन केली.

[२८]आणि इतर गोष्टींशिवाय माझ्यावर चालून येत आहे ती मंडळीची काळजी. [२९]कोण दुर्बळ झाला आहे आणि मी दुर्बळ झालो नाही? कोणाला अडथळा केला गेला आणि मी संतप्त झालो नाही?

[३०]मला जर अभिमान मिरवणे भाग असेल, तर मी माझ्या अशक्तपणाच्या गोष्टींविषयी अभिमान मिरवीन. [३१]आपल्या प्रभू येशूचा देव आणि पिता युगानुयुग धन्यवादित आहे; तो हे जाणतो की, मी खोटे बोलत नाही.

[३२]दिमिष्कात मला धरण्यासाठी अरीतास राजाच्या सुभेदाराने दिमिष्क्यांच्या नगरावर पहारा ठेवला. [३३]पण मला पेटाऱ्यात बसवून, खिडकीतून तटावरून उतरवण्यात आले आणि मी त्याच्या हातांतून सुटलो.

१२ **मला अभिमान मिरवणे** भाग आहे; हे उचित नाही पण मी प्रभूच्या दर्शनांकडे व प्रकटीकरणांकडे येत आहे. [२]मला एक ख्रिस्तातील मनुष्य माहीत आहे; तो चौदा वर्षांपूर्वी (सशरीर की अशरीर हे मला माहीत नाही, देवाला माहीत आहे) तिसऱ्या स्वर्गापर्यंत नेला गेला. [३]तो मला माहीत आहे. आणि असा तो मनुष्य (सशरीर की अशरीर हे मला माहीत नाही, देवाला माहीत आहे) [४]सुखलोकात उचलून नेला गेला व ज्या गोष्टी माणसाने बोलणे योग्य नाही अशा गुप्त गोष्टी त्याने ऐकल्या. [५]मी अशा मनुष्याविषयी अभिमान मिरवीन. पण मी माझ्या अशक्तपणाशिवाय माझ्याविषयी काही अभिमान मिरवणार नाही. [६]कारण आपण अभिमान मिरवावा अशी जरी मी इच्छा धरली, तरी मी मूर्ख होणार नाही, कारण मी जे खरे ते बोलेन; पण मी स्वतःस आवरले पाहिजे. म्हणजे कोणी जे माझे पाहतो किंवा ऐकतो त्याहून त्याने मला अधिक मानू नये. [७]आणि प्रकटीकरणांच्या विपुलतेमुळे, मी मर्यादेबाहेर चढून जाऊ नये, म्हणून माझ्या देहात एक काटा दिलेला आहे, तो मला ठोसे मारणाऱ्या सैतानाचा दूत आहे; म्हणजे मी मर्यादेबाहेर चढून जाऊ नये. [८]माझ्यामधून तो निघावा म्हणून मी प्रभूला ह्याविषयी तीनदा विनंती केली, [९]आणि त्याने मला म्हटले की, 'माझी कृपा तुला पुरे आहे, कारण अशक्तपणात माझे सामर्थ्य पूर्ण होते.' म्हणून, फार आनंदाने, मी माझ्या अशक्तपणात अभिमान मिरवीन, म्हणजे ख्रिस्ताचे सामर्थ्य माझ्यावर रहावे; [१०]आणि म्हणून ख्रिस्तासाठी आजारांत, अपमानांत व आपत्तींत, पाठलागांत आणि दुःखांत मी संतुष्ट असतो. कारण मी जेव्हा दुर्बळ आहे तेव्हा मी बलवान आहे.

[११]**मी मूर्ख झालो**, तुम्ही मला भाग पाडले; तुम्ही माझ्याविषयी खातरी द्यायला पाहिजे होती कारण मी काहीच नसलो, तरी त्या अतिश्रेष्ठ प्रेषितांपेक्षा मी कोणत्याही गोष्टीत कमी नाही. [१२]खरोखर पूर्ण सोशिकपणाने चिन्हे, अद्भुते व चमत्कार घडवून तुमच्यात प्रेषितांची चिन्हे करण्यात आली. [१३]कारण मी स्वतः तुमच्यावर भार घातला नाही ह्या एका गोष्टीशिवाय तुम्ही दुसऱ्या कोणत्या गोष्टीत दुसऱ्या मंडळ्यांपेक्षा कमी आहात? मला ह्या अपराधाची क्षमा करा.

[१४]बघा, मी तिसऱ्या वेळी तुमच्याकडे येण्यास तयार आहे, आणि तुमच्यावर भार घालणार नाही; कारण मी तुमचे मिळवू पहात नाही, पण मी तुम्हाला मिळवू पाहतो. कारण मुलांनी आईबापांसाठी साठवू नये, पण आईबापांनी मुलांसाठी साठवले पाहिजे. [१५]मी तुमच्या जिवांसाठी फार आनंदाने खर्च करीन आणि खर्ची पडेन. मी जर तुमच्यावर फार प्रीती केली तर माझ्यावर कमी प्रीती केली जावी काय?

[१६]असे असेल; मी तुमच्यावर भार घातला नाही पण मी धूर्त असल्यामुळे मी तुम्हाला युक्तीने धरले. [१७]मी

तुमच्यासाठी ज्यांना पाठविले अशा कोणाकडून मी तुमचा
फायदा घेतला काय? [१८]मी तीताला विनंती केली आहे
आणि मी एका बंधूला त्याच्याबरोबर पाठवीत आहे.
तीताने तुमच्याकडून फायदा मिळवला काय? आम्ही
एकाच आत्म्याने चाललो नाही काय? एकाच चालीने
चाललो नाही काय?

[१९]तुम्हाला इतका वेळ वाटत असेल की, आम्ही
तुमच्यापुढे आमचे समर्थन करीत आहो, आम्ही देवासमोर
ख्रिस्तात बोलत आहो; आणि, प्रियांनो, सर्व गोष्टी तुमच्या
उभारणीसाठी आहेत.

[२०]कारण मला भीती वाटते की, मी येईन तेव्हा, मी
अपेक्षा करीत असेन तसे, कदाचित्, तुम्ही मला
आढळणार नाही; आणि तुम्ही अपेक्षा करणार नाही असा
मी तुम्हाला आढळेन. कदाचित्, तुमच्यात कलह, ईर्ष्या,
राग, विरोध, कुरकुरी, रुसवे व गोंधळ मला आढळून
येतील. [२१]किंवा मी पुन्हा येईन तेव्हा माझा देव
तुमच्यासमोर मला लीन करील, आणि ज्यांनी पाप केले
असून आपण केलेल्या अमंगळपणाचा, जारकर्माचा व
कामातुरपणाचा ज्यांनी पश्चात्ताप केलेला नाही अशा
पुष्कळ जणांसाठी मला शोक करावा लागेल.

१३ मी आता तिसऱ्या वेळी तुमच्याकडे येत
आहे. दोन किंवा तीन साक्षींच्या तोंडून प्रत्येक
शब्द सिद्ध होईल. [२]ज्यांनी पूर्वी पाप केले होते त्यांना
आणि दुसऱ्या सगळ्यांना मी अगोदर सांगितले होते,
आणि दुसऱ्या वेळी स्वतः आलो होतो तेव्हाप्रमाणे आता
दूर असताना मी आधी सांगतो की, मी जर पुन्हा आलो तर
गय करणार नाही; [३]कारण माझ्या द्वारे ख्रिस्त बोलतो ह्याचे
तुम्ही प्रमाण मानता; तो तुमच्यात दुर्बळ नाही पण
तुमच्यात समर्थ आहे. [४]कारण जरी अशक्तपणात तो
वधस्तंभावर खिळला गेला तरी देवाच्या सामर्थ्याने तो
जिवंत आहे. कारण त्याच्यात आम्हीही दुर्बळ आहोत पण
आम्ही देवाच्या सामर्थ्याने तुमच्यासाठी जिवंत राहू.

[५]तुम्ही विश्वासात राहता काय, म्हणून आपली
स्वतःची परीक्षा करा, आपली स्वतःची पारख करा.
तुम्हाला आपल्यात येशू ख्रिस्त आहे हे कळत नाही
काय? नसेल तर मग, तुम्ही कसोटीस न उतरलेले
आहात. [६]मी आशा करतो की, आम्ही कसोटीस न
उतरलेले नाही हे तुम्ही ओळखाल. [७]आता देवाजवळ मी
हे मागतो की, तुम्ही काही वाईट करू नये; म्हणजे आम्ही
कसोटीस उतरलेले दिसावे म्हणून नाही, पण आम्ही
कसोटीस न उतरलेले असलो तरी तुम्ही चांगले ते करावे.
[८]कारण आम्ही सत्याविरुद्ध काही करू शकत नाही, पण
सत्यासाठी करू शकतो.

[९]जेव्हा आम्ही दुर्बळ आहो व तुम्ही बलवान आहा
तेव्हा आम्ही आनंद करतो व तुमच्यात अधिकाधिक
सुधारणा व्हावी अशी प्रार्थना करतो. [१०]एवढ्याकरता दूर
असताना मी ह्या गोष्टी लिहीत आहे, म्हणजे प्रभूने मला
जो अधिकार उभारणी करण्यास दिलेला आहे, नाश
करण्यास नाही, त्याचा उपयोग करून, मी तेथे असताना
कडकपणा वापरू नये.

[११]शेवटी, जयजय. बंधूंनो, तुम्ही आपली
अधिकाधिक सुधारणा करा. तुमचे सांत्वन होवो. तुम्ही
एकमनाचे व्हा व शांतीने रहा; आणि प्रीतीचा व शांतीचा
देव तुमच्याबरोबर राहील. [१२]पवित्र चुंबनाने एकमेकांना
सलाम द्या. [१३]तुम्हाला येथील सर्व पवित्र जन सलाम
पाठवतात.

[१४]प्रभू येशू ख्रिस्ताची कृपा, देवाची प्रीती आणि
पवित्र आत्म्याची सहभागिता तुम्हा सर्वांबरोबर असो.
आमेन.